# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 11 मे 2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 21 सप्टेंबर 2020.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 30 सप्टेंबर 2020, 14 ऑक्टोबर 2020, 23 ऑक्टोबर 2020, 29 ऑक्टोबर 2020, 03 नोव्हेंबर 2020, 14 नोव्हेंबर 2020, 23 नोव्हेंबर 2020.
7. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 01 ऑक्टोबर 2020, दि. 27 ऑक्टोबर 2020, 02 नोव्हेंबर 2020, 05 नोव्हेंबर 2020, 15 नोव्हेंबर 2020, 24 नोव्हेंबर 2020.
8. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 27 नोव्हेंबर 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 01 / 12 /2020.

आदेश:-

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 8 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 31 डिसेंबर 2020 पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये व फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 मधील तरतुदींनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून लॉकडाऊनच्या वाढविलेल्या कालावधीत महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. 8 चे आदेशान्वये दिलेल्या **मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन संपूर्ण उस्मानाबाद जिल्ह्यात दिनांक 01 डिसेंबर 2020 पासून ते 31 डिसेंबर 2020 रोजीचे 24.00 वाजे पर्यंत लॉकडाऊनचा कालावधी वाढवित आहे.**

उस्मानाबाद जिल्ह्यात दिनांक 31 डिसेंबर 2020 पर्यंत वाढविण्यात आलेल्या लॉकडाऊनचे कालावधीत संदर्भ क्र. 4 च्या आदेशामध्ये नमूद गृह विलगीकरण (Home Quarantine) च्या नियमांचे उल्लंघन करणा-या व्यक्तीविरोधात दंडात्मक कारवाई करणेबाबतचे आदेश संपूर्ण उस्मानाबाद जिल्ह्यात



Scanned by CamScanner

पूर्वीप्रमाणेच लागू राहतील. तसेच संदर्भ क्र. 5 च्या आदेशान्वये नमूद केलेल्या गैरकृत्यांबाबत दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश संपूर्ण जिल्ह्यात पूर्वीप्रमाणेच लागू राहतील.

लॉकडाऊनचे कालावधीत संपूर्ण उस्मानाबाद जिल्ह्यात या कार्यालयाचे संदर्भ क्र. 7 मध्ये नमूद आदेश लागू राहतील. या कार्यालयाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश या आदेशासोबत दि. 31 डिसेंबर 2020 पर्यंत लागू राहतील. तसेच राज्य शासनाने व या कार्यालयाने यापूर्वी वेळोवेळी अन्य कोणत्याही विशिष्ट/सर्वसाधारण आदेशानुसार परवानगी दिलेल्या बाबी परवानगी आदेशात नमूद केलेल्या अटी व शर्तीसह चालू राहतील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60, महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम 2020 चे नियम 11, साथरोग अधिनियम 1897 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 व इतर लागू होणा-या कायदेशीर तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 01.12.2020 पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. विभागीय व्यवस्थापक, मध्य रेल्वे, सोलापूर.
4. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
5. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
6. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
7. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
8. विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.
9. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
10. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
11. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
13. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
14. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
15. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
16. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
17. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner